# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

विषय– जुलै–ऑगस्ट २०२३ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षा वेळापत्रकाबाबत

## प्र क ट न

जुलै–ऑगस्ट २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षेची लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) सर्वसाधारण व द्विलक्षी विषय | मंगळवार, दि. १८ जुलै, २०२३ ते मंगळवार, दि. ०८ ऑगस्ट, २०२३ |
| २. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) व्यवसाय अभ्यासक्रम | मंगळवार, दि. १८ जुलै, २०२३ ते शनिवार, दि. ०५ ऑगस्ट, २०२३ |
| ३. | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १०वी) | मंगळवार, दि. १८ जुलै, २०२३ ते मंगळवार, दि. ०१ ऑगस्ट, २०२३ |

इ. १० वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा मंगळवार, दि. १८ जुलै, २०२३ ते मंगळवार, दि. ०१ ऑगस्ट, २०२३ व इ. १२ वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा मंगळवार, दि. १८ जुलै, २०२३ ते शनिवार, दि. ०५ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे.

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत **www.mahahsscboard.in** संकेतस्थळावर ०६ जून, २०२३ पासून उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ठ व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सॲप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०६ जून, २०२३

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.